(E

तात्काळ/महत्वाचे
कालमर्यादा

जा.क्र.शिउसं/प्राथ-२०१/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०१९-२०/ 3862
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे – १ यांचे कार्यालय
दिनांक : - 22 OCT 2019

प्रति,
अध्यक्ष/सचिव
ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले शिक्षण संस्था

विषय :- सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा ( स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेसाठी परवानगी देण्याबाबत....

संदर्भ :- १. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १,६ व १४).२०१२.
२. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. नाहप्र-२००९/(६६३/०९)/माशि-१ दिनांक २० जुन २०१२.
३. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. एसएफएस-२०१९/प्र.क्र.३७५६/एसएम-२ दिनांक ११.०९.२०१९

वरील विषयी आपणांस कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनिमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१८ - १९ मध्ये नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता प्रस्ताव सादर केला होता.त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्रमांक ३-च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता खालील अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे.

| शासन यादी अ.क्र | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/दर्जावाढ व मंडळ संलग्नता | मान्यता वर्ग/इयत्ता | मान्यतावर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | पुणे | ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले शिक्षण संस्था | डिव्हाईन इंग्लिश मिडीयम स्कूल, तुळजाभवानी नगर, पिंपळे गुरव पुणे . | इंग्रजी | दर्जावाढ (राज्यमंडळ) (स्वयंअर्थसहाय्यित शाळा) | प्राथमिक ते माध्यमिक (इयत्ता ३ री ते इयत्ता १० वी) | २०१९-२० |

अटी व शर्ती :-

१. शासन निर्णयातील अट क्र. १ नुसार सदर संस्थेने लगतच्या तीन वर्षांचे लेखापरिक्षण अहवाल विभागीय शिक्षण उपसंचालक यांच्याकडे तीन महिन्याच्या आत सादर करणे आवश्यक आहे. या बाबीची पूर्तता न केल्यास सदर शाळेचे मान्यता आदेश आपोआपच रद्द समजण्यात येईल. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद पुणे यांनी सदर शाळेस प्रथम मान्यता देताना उपरोक्त अटीची पूर्तता झाली किंवा नाही याबाबत विभागीय उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालयाकडून खात्री करुनच प्रथम मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात यावी.
२. सदर शाळेनी बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमाची/तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.
३. पात्र ठरलेल्या संबंधित शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यासस परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे.
४. ज्या व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबीची पुर्तता आहे अशा व्यवस्थापनांनी शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्हयांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे अर्ज करावेत
५. ज्या व्यवस्थापनास सन २०१९-२० करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले आहे. अशा व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबीची पुर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्दबातल ठरेल.
६. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/दर्जावाढ शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) मुख्य अधिनियम २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.
७. संबंधित सक्षम अधिकाऱ्यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी.व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.
८. संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही, शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल.
९. युडायस डाटा- या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/दर्जावाढ शाळाबाबत जिल्हानिहाय U-DISE (Unfified District Infofmation System For Education) मध्ये माहिती भरताना, स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे संस्थेने, सर्व संबंधिताच्या माहितीकरीता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नविन शाळा/दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.
१०. परवानगी दिलेल्या स्वयंअर्थसहाय्यित शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची भरती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे करावी.

(प्रविण अहिरे)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे - १

प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी

१. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे/अहमदनगर/सोलापूर.

प्रति माहितीसाठी सविनय सादर

१. मा. अप्पर सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई – ३२
२. मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.